महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.

**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005**

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | |
|---|---|---|
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 / 25536712 (OFF) | FAX- 020/25536761<br>E-MAIL sscboardpune@gmail.com<br>Web site www.sscboardpune.in |


कमांक : पुविमं / षाखा पी–1 / 3816
पुणे–411004
दिनांक. 07 / 07 / 2023
10

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
पुणे / अहमदनगर / सोलापूर

विषयः– जुलै–ऑगस्ट 2023 मध्ये घेण्यात येणा–या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) पुरवणी परीक्षेतील तोंडी अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी, व प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत......

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, जुलै–ऑगस्ट 2023 मध्ये घेण्यात येणा–या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेतील तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.

| अ. क | परीक्षेचा तपशिल | परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| 1. | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | मंगळवार, दिं 18 जुलै, 2023 ते मंगळवार, दिं 01 ऑगस्ट,2023 |
| 2. | एन एस क्यु एफ अंतर्गत व्यावसायिक अभ्यासकम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| 3. | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| 4. | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार, दिं 18 जुलै, 2023 ते शुक्रवार, दिं 28 जुलै, 2023 |

**सदर परीक्षेसाठी पुढील सुचनानुसार कार्यवाही करावी.**

1. विज्ञान व तंत्रज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीने परिक्षा केंद्रावरच घेण्यात येईल. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक म्हणून संबंधित केंद्रांनी शाळेतील शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.
2. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यशिक्षण अंतर्गत विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा सोबतच्या **परिशिष्ट 'अ'** नुसार दिनांक 18 / 07 / 2023 ते दिनांक 28 / 07 / 2023 या कालावधीत संबधित मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावरुन प्रचलित कार्यपध्दतीनुसार आयोजित कराव्यात.
3. सर्व शाळांनी संबधित विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षांची दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वीच विद्यार्थ्यांना अवगत होईल याबाबत दक्षता घ्यावी.
4. **NSQF** अंतर्गत व्यावसायिक अभ्यासकम विषयांची प्रात्यक्षिक परिक्षा दि.18 / 07 / 2023 ते दिं. 01 / 08 / 2023 या कालावधीत आयोजित करण्यात याव्यात.

## प्रात्यक्षिक व अंतर्गत मुल्यामापन परीक्षेबाबतच्या सुचनाः—

1. सर्व पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे तोंडी, अंतर्गत मूल्यमापन व प्रात्यक्षिक परीक्षा, इ. प्रचलित पध्दतीनुसार नव्याने घ्यावयाची आहे. कोणत्याही परिस्थितीत अशा विद्यार्थ्यांचे जुने गुण कळवू नयेत.
2. जुन्या अभ्यासक्रमानुसार मार्च/जुलै 2019 पर्यंतच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इ. 10 वी परीक्षेस अनुत्तीर्ण झालेल्या व त्यानंतर प्रथमच प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा नविन अभ्यासक्रमानुसार घेण्यात यावी.
3. प्रात्यक्षिक परीक्षेच्या व तोंडी परीक्षेच्या गुणपत्रिका या ओएमआर (**OMR**) पध्दतीच्या असल्यामुळे सदर गुणपत्रिकेमध्ये समाविष्ट असलेल्या बैठक क्रमांकाव्यतिरिक्त अन्य बैठक क्रमांकाची नोंद करण्यात येवू नये. हाताने लिहिलेल्या बैठक क्रमांकांचे गुण मशिनद्वारे स्कॅनिंग केले जात नाही. यांची नोंद घ्यावी.
4. प्रवेशपत्रिकेमध्ये विद्यार्थ्यांच्या विषयामध्ये माध्यम बदल/विषय बदल असेल तर मूळ ओएमआर (**OMR**) मध्ये बैठक क्रमांकासमोर माध्यम बदल/विषय बदल **असा लाल शाईने शेरा देण्यात यावा** व सोबत जोडलेल्या नमुना तक्ता **परिशिष्ट 'ब'** मध्ये गुणांची नोंद करुन देण्यात यावी.
5. अतिरिक्त बैठक क्रमांकाने जे विद्यार्थी प्रविष्ठ होणार आहेत. तसेच विषय बदलाची दुरुस्ती झालेल्या बैठक क्रमांकाच्या गुणांची नोंद सोबत दिलेल्या नमूना तक्ता **परिशिष्ट 'ब' मध्ये करुन शाळा क्रमांक नमुद करुन शेवटी मुख्याध्यापक सही शिक्क्यासहित स्वतंत्ररित्या जमा कराव्यात.**

## महत्वाच्या सूचना

1. **तोंडी, श्रेणी व प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य दिनांक 14/07/2023 रोजी मंडळ कार्यालयातूनच आपल्या प्रतिनिधीमार्फत आपले अधिकार पत्र देवून घेवून जावे.**
2. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षामधील श्रेणी व प्रात्याक्षिक परीक्षेचे साहित्य. तसेच अंतर्गत मूल्यमापनाचे **पुणे जिल्हयाचे गुणतक्ते दिनांक 02/08/2023, तसेच अहमदनगर व सोलापूर दिनांक 03/08/2023** रोजी मंडळ कार्यालयात प्रत्यक्ष जमा करावेत.

   या निर्धारित केलेल्या तारखेस साहित्य जमा न केल्यास व त्यामुळे विद्यार्थ्याचे नुकसान झाल्यास याबाबतची सर्व जबाबदारी आपली राहील तसेच याबाबत मंडळ नियमावलीनुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

टिपः—

जे विद्यार्थी अतिविलंबाने प्रविष्ठ झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांची तोंडी, अंतर्गत मूल्यमापन व प्रात्यक्षिक परीक्षा घेवून त्याचे गुण सोबत दिलेल्या नमूद तक्यात भरुन स्वतंत्र जमा करावेत व जर विद्यार्थी परीक्षेस गैरहजर असल्यास त्याची गैरहजेरी पाठवणे अनिवार्य आहे. याची नोंद घ्यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे—411005

प्रत माहितीस्तव,
केंद्रसंचालक,जुलै—ऑगस्ट 2023 परीक्षा केंद्र—पुणे/अहमदनगर/सोलापूर.